# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/08/2023 (मंगळवार) दुपार

---

### चोरी

**पो.स्टे. अरोली** :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा रेवराल हनुमान मंदीर येथे दिनांक १३/०८/२०२३ चे १२.०० वा. ते १९.०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– प्रविणजी जामलाल तिवारी हे दि. १३/०८/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. हनुमान मंदीरामध्ये सकाळची आरती केली व मंदीरामध्ये थोडावेळ थांबुन १२/०० वा. देवांना भोग लावुन मंदीराच्या दाराची कडी लावुन आपल्या रूममध्ये गेले त्यानंतर सायंकाळी अंदाजे ०४/०० वा. मंदीराची साफसफाई करणेकरीता गेले तेव्हा फिर्यादीने देवांच्या मुर्तीकडे लक्ष दिले नाही व नंतर ०७/०० वा. आरती करण्याकरीता गेले तेव्हा मंदीरात असलेले श्रीराम, लक्ष्मण, सीता व दुर्गामाता यांचे डोक्यावर असलेले चांदीचे चारही जुने वापरते मुकुट वजन अंदाजे ०१ किलो ग्रॅम किंमती अंदाजे ३०,०००/–रू. चे चांदीचे मुकुट फिर्यादीला देवीदेवतांचे डोक्यावर दिसले नाही. करीता फिर्यादीने लगेच हनुमान मंदीराच्या कमीटीतील सर्व सदस्यांना सांगितले असता हनुमान मंदीराचे अध्यक्ष व कमीटीतील सदस्य हे फिर्यादीच्या सोबतच गावातील हनुमान मंदीराकडे आले व मंदीराचे पाहणी केली असता हनुमान मंदीरातील श्रीराम, लक्ष्मण, सीता व दुर्गामाता यांचे डोक्यावर असलेले चांदीचे मुकुट हे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक पोकळे मो. नं. ९८६०३५३१७९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**